लोकमत सिंधुदुर्ग, मंगळवार, २८ जुलै २०१५

# व्यक्तिमत्त्वाला संस्थापक रुप द्यावे

## व्ही. ए. पाटील : दोडामार्गात मुंबई विद्यापीठाचा वर्धापन उत्साहात

**दोडामार्ग :** विद्यार्थ्यांनी ज्ञानोपासना करताना स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाला संस्थात्मक स्वरुप देऊन सामाजिक कार्य करावे, असे प्रतिपादन येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाचा वर्धापन दिन व पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश घेतलेल्या नवागतांचे स्वागत अशा आयोजित केलेल्या संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.

डॉ. पाटील म्हणाले, देशातील पहिल्या कोलकाता विद्यापीठाची स्थापना २६ जानेवारी १८५७ मध्ये झाली. त्यानंतर मुबंई विद्यापीठाची स्थापना झाली. या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू होण्याचा मान विल्यम यार्डले यांना मिळतो. अर्थात विद्यापीठाची स्थापना होण्याअगोदर इंग्रजी उच्च शिक्षणाचा पाया मुंबईत घालण्यात आला.

१८३२ ते १८४५ या कालखंडात मुंबईत एल्फिस्टन कॉलेज, विल्सन कॉलेज व ग्रॅट मेडिकल कॉलेज अशी तीन महाविद्यालये अस्तित्वात होती. आज मुंबईतच नव्हे; तर संपूर्ण महाराष्ट्रात अनेक महाविद्यालये व विद्यापीठांचे जाळे विणून उच्च शिक्षणाची गंगा घरोघरी पोहोचविण्याचे काम केले गेले असले, तरी ही वाढ केवळ संख्यात्मक आहे. दर्जात्मक वाढ मात्र फारच कमी असून शिक्षणाचा दर्जा वाढविल्याशिवाय समाजाचा आणि देशाचाही विकास होणार नाही, असे डॉ. व्ही. ए. पाटील म्हणाले. सूत्रसंचालन भाग्यश्री पवस हिने केले. प्रिती गवस हिने आभार मानले. (प्रतिनिधी)

वैभव साळकर




लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयात मुंबई विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### राज्यात उच्च शिक्षण पोर्तुगीजांमुळे

महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने पाश्चात्त्य व उच्च शिक्षणाचा पाया ब्रिटिशांअगोदर पोर्तुगीजांनी घातला. सोळाव्या शतकातच, म्हणजेच शिवकालाच्या अगोदरच पार्तुगीजांनी मुंबईत १५८० मध्ये जेसुईट कॉलेज, तर १६२० मध्ये कॉलेज ऑफ सेंट ॲन ही दोन महाविद्यालये सुरु केली.